## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार )

जा.क्र.२३३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०३/२०१७

**१) मोटार सायकल चालकांच्या निष्काळजीपणामुळे अल्पवयीन मुलास गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २५/०३/२०१७ ते १२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी राकेश विश्वनाथ बिसने वय ४५ वर्ष, रा. शेष नगर पवनी यांचा जखमी मुलगा तन्मय राकेश बिसने वय १५ वर्ष, हा आपले सायकलने घरी जात असता यातील आरोपीने आपल्या ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन फिर्यादीचे मुलांचे सायकलला वनविभाग कार्यालय समोर पवनी येथे धडक मारुन त्यास गंभिर जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहे.

**२) दारूडया वाहन चालकावर कारवाई. :—**

दिनांक २९/०३/०१७ चे १२.०० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत भिलेवाडा शिवार एन एच ०६ रोडवर येथे चालवितांना मिळुन आल्याने त्याचे ब्रिथ अल्कोहोल ॲनालायझर मशिन व्दारे श्वासाचा नमुना घेतला असता अल्कोहोलचे प्रमाण मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. मते कारधा यांचे रिपोर्ट वरून पो. स्टे. कारधा येथे कलम १८५(१)मोवाका.सहकलम १३०(१)सी. एम. व्ही. आर / १७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मुटकुरे पोस्टे. कारधा हे करीत आहे.

**३) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकिस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २९/०३/०१७ चे १८.०० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन निलज येथे सार्वजनिक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कोडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) विहरीचे पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु. :—**

दिनांक २९/०३/२०१७ चे १९.०० वा दरम्यान यातील मृतक रुपचंद ढिवरु खांडेकर वय ६५ वर्ष, रा. चांलना ह. मु. बेला याने दारुचे नशेत सार्वजनीक विहरीचे पाण्यात उडी मारुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने फिर्यादी श्यामसुंदर दयाराम खांडेकर वय ६० वर्ष, रा. चालना यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे लाखनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. संतापे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहे.

**५) गळफास लावुन महीलेचा मृत्यु. :—**

दिनांक २९/०३/२०१७ चे १२.२५ वा दरम्यान यातील मृतक सौ. सारीका सुधीर बुराडे वय ३० वर्ष, रा. विरली/खंदाळ हिने स्वत:चे राहते घरी मधल्या खोलीत देवघरात सिलीग फॅनला ओढनीने गळफास लावुन आत्महत्या केल्याने फिर्यादी संतोष फत्तुजी जिभकाटे वय ६२ वर्ष, रा. विरली/खंदाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोस्टे अडयाळ येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे.

६) विषारी औषध प्राशन केल्याने औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु. :—

दिनांक २९/०३/२०१७ चे ०६.१५ वा दरम्यान यातील मृतक रमेश हिमदेव खडेंकर वय ५० वर्ष रा. सानगडी याने आपले राहते घरी कोणतीतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यास मृतकचे नातेवाईकांनी औषधोपचारा करीता उपजिल्हा रुग्णालय साकोली येथे आणुन भरती केले असता औषधोपचारा दरम्यान मरण पावल्याने फिर्यादी प्रमोद रमेश खडेंकर वय २७ वर्ष, रा. सानगडी यांचे तोंडी व डॉक्टरी मेमो वरुन पोस्टे साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहे.

७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक २९/०३/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली १२५ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०३, तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ११२ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

30-3

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

PSI

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.